# शिक्षक बँकेच्या पद भरतीत अनियमितता

## आरोपींमध्ये अध्यक्षांसह मंडळ सदस्यांची नावे ■ राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )** - जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेत घेण्यात आलेल्या पद भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा धक्कादायक प्रकार राजापेठ पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीवरून पुढे आला आहे. यापूर्वी या तक्रारीच्या अनुषंगाने आर्थिक गुन्हे शाखेकडे तपास सुरु होता. तपासानंतर 13 डिसेंबर रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीच्या आधारे हमालपुरा येथील अमरावती जिल्हा परिषद शिक्षक बँकेचे अध्यक्ष व सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह तत्कालीन संचालक मंडळाच्या सर्व सदस्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सोलापूरच्या नागरी सहकारी बँक असोसिएशनतर्फे 27 व 28 मार्च 2024 रोजी जिल्हा परिषद सहकारी शिक्षक बँकेत भरती प्रक्रिया घेण्यात आली. या भरती प्रक्रियेवर काही उमेदवारांनी आक्षेप घेतला होता. याबाबतची तक्रार वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. या भरती प्रक्रियेत मोजक्याच उमेदवारांची निवड केली जाईल, असा आरोप उमेदवारांनी केला. शिक्षक बँकेचे अध्यक्ष आणि संचालक मंडळावर कायदेशीर बाबींचे उल्लंघन करून पैशाचे व्यवहार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

> जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेच्या नोकरीतील पद भरतीत अनियमितता झाल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, भरती प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारांची नावे आधीच ठरलेली होती. तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षक बँकेचे अध्यक्ष आणि सोलापूर नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष गोकुळ राऊत यांच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक गुन्हे शाखा या प्रकरणाचा तपास करत आहे.
>
> **गणेश शिंदे, पोलिस उपायुक्त**

या भरती प्रक्रियेदरम्यान तक्रारदार व इतर उमेदवारांची फसवणूक झाली. ज्याची तक्रार यापूर्वी आर्थिक गुन्हे शाखेकडे दाखल करण्यात आली होती. ज्याची अधिकाऱ्यांनी चौकशी केली. तपासाअंती 13 डिसेंबर रोजी वरिष्ठांच्या आदेशानुसार फिर्यादीने राजापेठ पोलिस ठाण्यात या प्रकरणाची तक्रार नोंदवली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी हमालपुरा येथील जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेचे अध्यक्ष गोकुळ राऊत, तत्कालीन मंडळाचे सर्व सदस्य आणि सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुद्ध कलम 420, 120 (ब) अन्वये गुन्हा दाखल केला.

# सात वर्षापासून फरार आरोपी ताब्यात

## 3 लाख 19 हजाराचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.14 )**- शेंदूरजनाघाट पोलिसांच्या रेकॉर्डवर गेल्या सात वर्षांपासून फरार असलेल्या कुख्यात आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने रविवार 8 डिसेंबर रोजी वरुड शहरातील मुलताई चौकातून अटक केली त्याच्या ताब्यातून चोरीच्या दोन दुचाकी व मोबाईल जप्त करण्यात आल्या आहे.



नरेंद्र नथुजी कोडापे (वय 35 रा. मालखेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक 8 डिसेंबर रोजी वरुड तालुक्यातील गस्तीवर असताना रेकॉर्डवरील गुन्हेगार नरेंद्र कोडापे हा दुचाकीने तिवसाघाट येथून वरुडकडे येत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्याद्वारे नाकाबंदी करून मुलताई रोडने येत असताना तो सापडला त्याची झाडाझडती घेतली असता त्याच्याकडील दुचाकी चोरीची निघाली. त्या दुचाकीबाबत वरुड पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल आहे. त्याच्या अंगझडतीत मिळून आलेला मोबाईल देखील चांदूर बाजार पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या एका गुन्ह्यातील असल्याचे स्पष्ट झाले. उलट तपासणीत आपण काही दिवसापूर्वी छिंदवाडा येथून एक दुचाकी चोरून ती बैतूल येथे सोडून दिल्याचे त्याने पोलिसांना सांगितले बैतूल येथून एक दुचाकी चोरल्याची कबुली सुद्धा दिली. ती दुचाकी त्याच्या राहत्या घरातून जप्त करण्यात आली आहे. संपूर्ण कारवाईनंतर आरोपीस पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले सदर कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेचे पीआय किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पीएसआय सागर हटवार, बळवंत दाभने, भूषण पेठे, पंकज फाटे आदींनी केली.

# चहा देण्याच्या बहाण्याने महिलेवर लैंगिक अत्याचार

## अंजनगावसुर्जी पोलीस ठाण्यातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )**- अंजनगावसुर्जी शहरातील एका दुकानात काम करणाऱ्या महिलेसोबत तरुणाने लैंगिक अत्याचार केला. ही घटना 28 नोव्हेंबर रोजी घडली होती. याप्रकरणी महिलेने 13 डिसेंबर रोजी अंजनगावसुर्जी पोलिस ठाण्यात तक्रार केली. तक्रारीवरून पोलिसांनी अविनाश राजाराम हिवराये (वय 34) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अंजनगावसुर्जी पोलीस स्टेशन परिसरात राहणारी 35 वर्षीय महिला एका दुकानात काम करते. 28 नोव्हेंबर रोजी रात्री 8 वाजता ती काम आटोपून घरी जात होती. यावेळी आरोपी अविनाश हा त्याच्या खोलीजवळ उभा होता. त्याने महिलेला चहा पिण्यासाठी खोलीत बोलावले. परंतू महिलेने नकार दिला. पण त्यानंतर त्याने तिला जबरदस्तीने आपल्या खोलीत ओढले. त्यानंतर खोलीचा दरवाजा बंद करून तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास पती व मुलाला जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेने पीडित तरुणी खूपच घाबरली होती. त्यामुळे त्याने ही गोष्ट कोणाला सांगितली नाही. परंतू अखेर 13 डिसेंबर रोजी महिलेने अंजनगावसुर्जी पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची तक्रार केली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अविनाश हिवरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# कारच्या काचा फोडून एक लाखांच्या रोखीसह लॅपटॉपची चोरी

## उस्मानिया मशिदीजवळची घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.14 )**- शहरातील उस्मानिया मशिदीजवळील सरकारी क्वार्टरजवळ उभ्या असलेल्या कारच्या काचा फोडून अज्ञात चोराने एक लाख रुपयांची रोख व लॅपटॉप चोरून नेला. ही घटना 12 डिसेंबर रोजी रात्री 8 ते 9 वाजता दरम्यान घडली. ब्रिजकिशोर अमरदेव तिवारी (35, पार्वतीनगर क्र.3, अमरावती) यांच्या फिर्यादीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



पोलीस सूत्रांनुसार, ब्रिजकिशोर तिवारी यांचे पूजा साहित्य विक्रीचे दुकान आहे. त्यांचे वडील अमरदेव यांनी ब्रिजकिशोरला बँकेत जमा करण्यासाठी एक लाख रुपये दिले होते. मात्र ब्रिजकिशोरला गावी जायचे असल्याने त्यांनी बँकेत पैसे जमा केले नाहीत. त्यानंतर 12 डिसेंबर रोजी तो त्याचा मित्र प्रथमेश ठाकरे सोबत कार्यालयीन कामासाठी बसस्थानक मार्गावरील एका फर्निचरच्या दुकानात गेले. त्यांनी आपली कार उस्मानिया मशिदीजवळील सरकारी क्वार्टरजवळ उभी केली आणि ते पायीच फर्निचरच्या दुकानात गेले. दरम्यान, अज्ञातांनी कारची काच फोडून मागच्या सीटवर ठेवलेल्या बॅगेतील एक लाख रुपये रोख व लॅपटॉप असा चोरून नेला. ब्रिजकिशोर हा मित्रासोबत परतल्यानंतर चोरीची ही घटना उघडकीस आली. त्यानंतर ब्रिजकिशोरने सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# किल्ले गाविलगड शौर्यदिन उत्साहात साजरा

## चार किलोमीटर चढाई करून 250 तरुणांनी गाविलगड शौर्य दिवस केला साजरा

### प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांना वऱ्हाड भूषण पुरस्कार

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.14 )** - नागपूरचे भोसले यांच्या अधिपत्याखाली गाविलगडचे किल्लेदार वीर योद्धा बेनीसिंह यांचा 1803 मध्ये इंग्रजांशी लढता लढता वीरमरण आले. त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी स्वराज्य सेवा प्रतिष्ठान यांच्यावतीने सुरू करण्यात आलेला गाविलगड शौर्य दिवस, सलग आठव्या वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा आज 14 डिसेंबर रोजी सकाळी सात वाजता महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले कार्यकर्ते गाविलगडची चार किलोमीटर चढाई केली. बागलिंगा येथून 250 मावळ्यांनी गाविलगड किल्ल्यावर चढाई करून किल्ल्याची स्वच्छता, साफसफाई व इतिहासाचा करण्यात आला. यावेळी स्वराज्य प्रतिष्ठानचे प्रमुख शिवा काळे यांनी या मोहिमेत सहभागी युवकांना किल्ल्याच्या इतिहासाची माहिती करून दिली. किल्ल्यावरील महत्त्वाच्या ठिकाणांवर शिवराज्य प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी साफसफाई केली.





गाविलगड किल्ल्यावरील तोफ व ऐतिहासिक माहिती जाणून घेताना मोहिमेत सहभागी युवक अगदी भारावून गेले. यानंतर किल्ल्याच्या पहिल्या गेटवर कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष पृथ्वीराजसिंह राजपूत होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेते भारत गणेशपुरे, सुनील काळे, दिलीप हटवार, मिलिंद घारड, प्रशांत गारोडे, प्राचार्य एकनाथ तट्टे, चंद्रकांत, पाटील राजेश कावळे, अशोक चिनागी, सौ. नलिनी चिनागी, रंजनाताई मामर्डे, रतन बघाडे, दिलीप ठाकरे, स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवा काळे, विवेक चांदुरकर, किशोर वानखडे, प्रा. सतीश झामरे, प्रफुल रुईकर इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे 250 कार्यकर्ते सुद्धा उपस्थित होते. गाविलगड किल्ल्यावर शिवाजी महाराज की जय हर हर महादेव अशा घोषणा देण्यात आल्या. शिवाजी महाराजांच्या जयघोषाने गाविलगड परिसर निनादला. यावेळी प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांना स्वराज्य प्रतिष्ठान यांच्यावतीने वऱ्हाड भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# गोठ्याला आग लागून सात जनावरे होरपळली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )** - गोठ्याला आग लागून सात जनावरे गंभीर जखमी झाले असून पाच क्विंटल कापूस, खते, औषधी व शेतीपयोगी साहित्य जळून खाक झाले. ही घटना भगवानपूर यावली शहीद येथे काल सायंकाळी घडली. भगवानपूर यावली शहीद येथील शेतकरी गजानन सोनोने यांच्या शेतात गोठा बांधलेला असून या गोठ्यात जनावरे, कापूस, खते, औषधी व बियाणे होते. सायंकाळीच्या सुमारास लागलेल्या आगीमुळे 7 जनावरे गंभीर स्वरूपात जळाली. तसेच कापूस, खते, औषधी व शेतीपयोगी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच माजी जि. प. सदस्य प्रकाश साबळे यांनी तिथे भेट देऊन विचारपूस केली तसेच संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात अवगत केले. सदर शेतकरी कुटुंबास आर्थिक मदत मिळण्यासंदर्भात आश्वस्त केले. या प्रकरणाची माहिती तिवसा विधानसभेचे नवनियुक्त आमदार राजेश वानखडे यांना देण्यात आली. याप्रसंगी संपूर्ण सोनोने परिवार तसेच संदीप पाचघरे, उपसरपंच योगेशराव निंबोरकर, अविनाश वानखडे व संबंधित सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# संशयित तरुणाची एनआयएकडून चौकशी सुरूच

**अमरावती** - राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) ने गुरुवारी 12 डिसेंबरच्या पहाटे छाया नगरमध्ये छापा टाकून संशयित तरुणाला ताब्यात घेतले. 14 डिसेंबर रोजी तिसऱ्या दिवशीही एनआयएने संबंधित तरुणाला बोलावून चौकशी केली. शनिवारी रात्री झालेल्या चौकशीनंतर एनआयए परतल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. मात्र आतापर्यंत संशयित तरुणाने कोणती माहिती दिली हे गुप्त ठेवण्यात आले आहे. एनआयएच्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने गुरुवारी पहाटे नागपुरी गेट पोलिस स्टेशन हद्दीतील छायानगर भागातील एका घरावर छापा टाकला. 26 वर्षीय तरुण पाकिस्तानातील कोणत्याही संघटनेशी संबंधित आहे का आणि त्याला पाकिस्तानमधून फोन आला होता का? याबाबत एनआयए चौकशी करत होती. एनआयएने या संदर्भात अधिक माहिती दिलेली नाही. स्थानिक पोलिसांनी ही बाब गुप्त ठेवली आहे. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या तपासात आतापर्यंत काय समोर आले आहे, याची माहिती पोलिसांनाही नाही. शनिवारी रात्री उशिरापर्यंत संशयित तरुणाची चौकशी सुरू होती.

# 17 आणि 18 डिसेंबरला नागपूर-वर्धा मार्गे धावणाऱ्या अनेक रेल्वेगाड्या रद्द!

## दोन दिवस राहणार ब्लॉक : सिंदी रेल्वे स्थानकावर यार्ड रीमॉडेलिंग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )**- मध्य रेल्वेच्यानागपूर विभागातील नागपूर वर्धा सेक्शनमध्ये असलेल्या सिंदी रेल्वे स्थानकावर लाँगहॉल लूपसह थर्ड आणि फोर्थ लाईनच्या संबंधाने यार्ड रिमॉडेलिंग आणि ईलेक्ट्रीक इंटरलॉकिंग केले जाणार आहे. त्यामुळे या ठिकाणी 17 आणि 18 डिसेंबरला ब्लॉक करण्यात येणार आहे. परिणामी या मार्गाने धावणाऱ्या काही गाड्या रद्द करण्यात आल्या असून, काही गाड्या परावर्तित मार्गाने चालविल्या जाणार आहे. काही गाड्या शॉर्ट टर्मिनेट करण्यात आल्या आहेत. लांब अंतराच्या अनेक गाड्या उशिरा धावणार आहेत. यामुळे उपरोक्त दोन दिवस लाखो प्रवाशांची गैरसोय होण्याचे संकेत आहेत.



### रद्द करण्यात आलेल्या गाड्या

गाडी क्रमांक 01373 वर्धा - नागपूर मेमू, गाडी क्रमांक 01374 नागपूर वर्धा मेमू, गाडी क्र . 01371 अमरावती - वर्धा मेमू, 01372 वर्धा-अमरावती मेमू, 11121 भुसावळ - वर्धा एक्स्प्रेस, 11122 वर्धा - भुसावळ एक्स्प्रेस, 12119 अमरावती - अजनी एक्स्प्रेस, 12120 अजनी-अमरावती एक्स्प्रेस आणि गाडी क्रमांक 12119 अमरावती - जबलपूर एक्स्प्रेस या सर्व गाड्या 18 डिसेंबरला रद्द करण्यात आल्या आहेत.

### शॉर्ट टर्मिनेशन ओरिजिनेशन केलेल्या ट्रेन

गाडी क्रमांक 11039 कोल्हापूर - गोंदिया एक्स्प्रेस 17 डिसेंबर रोजी वर्धा रेल्वे स्थानकांवर थांबेल. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक 11040 गोंदिया कोल्हापूर एक्स्प्रेस 18 डिसेंबरला गोंदिया रेल्वे स्थानकावरून सुटण्याऐवजी वर्धा रेल्वे स्थानकावरून दुपारी 11:59 वाजता सुटेल.

### उशिरा धावणाऱ्या गाड्या

गाडी क्रमांक 05293 मुजफ्फरपूर - सिकंदराबाद एक्स्प्रेस 17 डिसेंबरला आपल्या निर्धारित वेळेत सुटण्याऐवजी 1 तास 35 मिनिटे उशिरा धावेल. 12621 चेन्नई नवी दिल्ली एक्स्प्रेस याच दिवशी 1.30 तास उशिरा, तर 20805 विशाखापट्टनम नवी दिल्ली एक्स्प्रेस तिच्या निर्धारित वेळेपेक्षा 1.15 तास विलंबाने धावेल. 12622 नवी दिल्ली चेन्नई एक्स्प्रेस 17 डिसेंबरला 1.10 तास विलंबाने, तर 12691 बंगळुरू हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस 45 मिनिटे उशिरा धावेल. 12810 हावडा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्स्प्रेस निर्धारित वेळेपेक्षा 30 मिनिटे, 12723 हैदराबाद न्यू दिल्ली एक्स्प्रेस 30 मिनिटे, 18030 कोलकाता शालीमार एलटीटी एक्स्प्रेस 15 मिनिटे, 22906 कोलकाता शालीमार ओखा एक्स्प्रेस 10 मिनिटे, 12970 जयपूर कोईम्बतूर एक्स्प्रेस 10 मिनिटे, 12843 पूरी अहमदाबाद एक्स्प्रेस 10 मिनिटे, 22670 पाटना एर्नाकुलम एक्स्प्रेस 10 मिनिटे, 12512 कोचुवेली गोरखपूर एक्स्प्रेस ही गाडी 10 मिनिटे, तर 01139 नागपूर मडगाव एक्स्प्रेस (18 डिसेंबरला) 10 मिनिटे उशिरा धावेल.

# राष्ट्रीय लोक अदालतीत 984 प्रकरणे निकाली

## चांदूर रेल्वे येथील तालुका विधी सेवा समितीव्दारे आयोजन



**महासागरप्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.14 )**- तालुका विधी सेवा समितीच्या वतीने चांदूर रेल्वे न्यायालयाच्या प्रांगणामध्ये शनिवारी (ता. 14) राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशेष मोहिमेमध्ये व लोक न्यायालयात एकूण 739 दाखल पूर्व प्रकरणे तसेच न्यायालयातील प्रलंबीत 245 प्रकरणे अशी एकूण 984 प्रकरणे निकाली काढण्यात आली असून 40 लाख 42 हजार 222 रुपयांची तडजोड करण्यात आली आहे. या राष्ट्रीय लोक न्यायालयाचे उद्घाटन सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती कृतिका शेंडे यांच्या हस्ते सरस्वती पुजन करुन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती सचिन शिंदे हे होते. या प्रसंगी चांदूर रेल्वे वकील संघाचे अध्यक्ष राजीव अंबापुरे व इतर सर्व वकील सदस्य तसेच सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. मेश्रास, ठाणेदार आकरे, सर्व बँकांचे प्रतिनिधी इत्यादी उपस्थित होते. या प्रसंगी दिवाणी न्यायाधीश सचिन शिंदे यांनी मनोगतातून लोकन्यायालयाची माहिती दिली व जास्तीत जास्त प्रकरणे तडजोड करण्याचे आवाहन केले होते. लोकन्यायालयाचे यशस्वितेकरीता न्यायालयाचे सहाय्यक अधिक्षक लक्ष्मण माहुलकर, व्ही.टी. बोरकर व इतर सर्व न्यायालयीन कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी श्री. देशमुख, विशाल धवसे व उषा मस्के यांनी अथक परिश्रम घेतले.

> **40 लाख 42 हजार 222 रुपयांची तडजोड**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४